# अण्णांना त्यांच्या टीममधील चौकडीने ईश्वरतुल्य बनवले



## परुळेकरांचा हल्लाबोल चालूच

नवी दिल्ली, दि. १२ - ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या टीममधील सदस्यांवरील शाब्दिक हल्ल्याचे सत्र राजू परुळेकर यांनी चालूच ठेवले आहे. या टीममधील चौकडीने आपले हित साधण्यासाठी आणि केंद्र सरकारवर दबाव टाकण्यासाठी अण्णांना ईश्वरतुल्य बनवून टाकले आहे, असा हल्लाबोल त्यांनी नव्याने केला आहे. त्यांनी केलेल्या या टीकेचे लक्ष्य अरविंद केजरीवाल, किरण बेदी, प्रशांत भूषण आणि मनीष सिसोदिया हे अण्णांचे प्रमुख सहकारी आहेत.

अण्णांच्या ब्लॉगचे काम पाहण्याची जबाबदारी परुळेकर यांच्यावर होती. मात्र, कोअर टीमच्या फेररचनेच्या मुद्द्यावरील वक्तव्यांपासून अण्णांनी स्वत:ला दूर ठेवले आणि यापुढे ब्लॉग लिहिण्याची जबाबदारी परुळेकर यांच्यावर न टाकण्याचे जाहीर केले. त्यानंतर परुळेकर यांनी टीम अण्णामधील सदस्यांवर टीकेची झोड उठवली आहे. काल रात्री उशिरा त्यांनी स्वत:च्या ब्लॉगवरून पुन्हा एकदा अण्णांच्या सहकाऱ्यांना लक्ष्य केले आहे. टीम अण्णामधील चौकडीने आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ही चौकडी प्रसारमाध्यमांमध्ये विविध विषयांवर तज्ज्ञ म्हणून आपली मते मांडतात. त्यातून त्यांनाही ईश्वरतुल्य असा दर्जा मिळत आहे, अशी खिल्ली त्यांनी उडवली आहे.

काश्मीरप्रश्नी जनमत आजमावले जावे, असे वादग्रस्त वक्तव्य प्रशांत भूषण यांनी केले होते. त्यावरून त्यांच्यावर विविध स्तरांतून टीका करण्यात येत होती. या टीकेमुळे भूषण यांना टीम अण्णाच्या कोअर टीममधून बाहेर रस्ता दाखवला जाईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र, भूषण यांना हटवण्यात आले नाही. यापार्श्वभूमीवर, परुळेकर यांनी थेट अण्णांनाच काही प्रश्न विचारले आहेत. भूषण यांना कोअर टीममधून न हटवण्याबाबत कुणी दबाव टाकला याचे उत्तर अण्णांनी द्यावे. याशिवाय, केजरीवाल आणि सिसोदिया यांच्या आर्थिक व्यवहारांची आणि महत्त्वाकांक्षांची माहिती अण्णांना आहे का, असा सवालही त्यांनी केला आहे.

जनलोकपाल विधेयका-साठीच्या चळवळीबाबतही परुळेकर यांनी सवाल उपस्थित केले आहेत. व्यवस्थेमुळे भ्रमनिरास झालेल्या लोकांची दिशाभूल केली जात आहे. या स्वकेंद्रित चळवळीमुळे त्यांच्यासाठी येथे स्वर्ग निर्माण होईल आणि जनलोकपाल कायदा आल्यामुळे ५० टक्क्यांहून अधिक भ्रष्टाचार संपुष्टात येईल, असे लोकांना सांगितले जात आहे. मात्र, सत्य यापेक्षा खूपच वेगळे आहे. २० किंवा त्यापेक्षा अधिक लोकांचा हा समूह आणि त्यातील चौकडी देशाला मार्ग दाखवत आहे आणि सरकारवर दबाव टाकत आहे. आपण आपला देश या चार-पाच लोकांच्या हातात सोपवणार आहोत का, असा सवालही त्यांनी विचारला आहे. रामदेवबाबा, श्री श्री रविशंकर, मेधा पाटकर, राजेंद्र सिंह, संतोष हेगडे हे या चळवळीपासून दूर झाले आहेत,असा दावाही परुळेकर यांनी केला आहे.

### ती बैठक वादळी ठरल्याचा दावा

नवी दिल्ली,दि.१२-राळेगणसिद्धीत अण्णा आणि त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये ३० ऑक्टोबरला बैठक झाली होती. ती बैठक वादळी ठरल्याचा दावाही राजू परुळेकर यांनी केला आहे. केजरीवाल आणि इतर सहकाऱ्यांच्या भूमिकेशी अण्णांनी असहमती दर्शवली होती, असेही त्यांनी म्हटले आहे. याबाबत परुळेकर यांनी म्हटले आहे की, टीम अण्णांच्या फेररचनेबाबत अण्णांनीच लिहिलेले आणि त्यांची स्वाक्षरी असलेले पत्र मी बैठकीत त्यांच्या तीन सहकाऱ्यांना दाखवले. हे पत्र पाहून अण्णांचे सहकारी हादरले. मात्र, त्यांची घमेंड कायम होती. त्यावेळी केजरीवाल म्हणाले, आम्ही (टीम अण्णा) टीम जैसे थे ठेवण्याचा निर्णय कोसंबीमधील बैठकीत घेतला आहे. त्यामुळे हे पत्र निरर्थक आहे. एवढेच नव्हे तर, टीम अण्णांची फेररचना केल्यामुळे जनलोकपाल मुद्द्याला बाधा पोहोचेल, असा दावाही त्यावेळी केजरीवाल यांनी केला, असे परुळेकर यांनी म्हटले आहे.